# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. ०५ डिसेंबर,२०१९

जळगाव दि.०५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ.आंबेडकर विचारधारा व सामाजिकशास्त्र प्रशाळेच्यावतीने ६ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त भाषा अभ्यासप्रशाळा व संशोधन केंद्रांचे संचालक, प्रा.डॉ.म.सु.पगारे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.अनिल डोंगरे राहणार आहेत. सामाजिकशास्त्र प्रशाळेच्या ग्रंथालय हॉलमध्ये सकाळी १० वाजता व्याख्यान होणार आहे. असे डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे सहाय्यक प्रा.विजय घोरपडे, हर्षल पाटील यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क □ धिकारी